**पंतप्रधान आणि मेक्सिको राष्ट्राध्यक्षांची जी-7 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भेट (17 जून 2025)**

17 जून 2025

पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी आणि मेक्सिकोचे महामहिम राष्ट्राध्यक्ष डॉ. डॉ. क्लाउडिया शेनबाउम पार्डो यांमध्ये आज बैठक पार पडली. कनानास्किस (कॅनडा) येथे जी-7 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भेट झाली. उभय नेत्यांदरम्यान ही पहिलीच बैठक होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्षांचे ऐतिहासिक विजयाबद्दल अभिनंदन केले.

2. भारताच्या दहशतवाद विरोधी लढाईत मेक्सिकोच्या पाठिंब्याबद्दल पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्षा शेनबाउम यांचे आभार मानले. बैठकीदरम्यान, उभय नेत्यांनी भारत आणि मेक्सिको दरम्यानचे मैत्रीपूर्ण बंध अधोरेखित केले. व्यापार, गुंतवणूक, स्टार्ट-अप्स, विज्ञान आणि तंत्रज्ञान, ऑटोमोटिव्ह सेक्टर आणि नागरिक परस्पर आदान-प्रदान क्षेत्रात सहकार्य विस्तार करण्यासाठी उभय नेत्यांनी सकारात्मकता दर्शविली. उभय देशांतील व्यापार आणि गुंतवणूक सहकार्यावर समाधान व्यक्त करताना, आगामी काळातील मेक्सिकोच्या वतीने उपलब्ध होणाऱ्या संभाव्य संधीवर विचारविनिमय केला. फार्मास्युटिकल क्षेत्रातील वाढत्या संधी, ज्यामुळे भारतात माफक किंमतीत औषधे व अन्य फार्मास्युटिकल उत्पादने यांची निर्मिती आणि पुरवठा करण्यामध्ये भारत महत्वाची भूमिका निभावू शकतो. कृषी आणि सर्वांगीण आरोग्य विषयांवर देखील सविस्तर चर्चा पार पडली.

3. तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि डिजिटल पायाभूत सुविधा यामधील भारताच्या उल्लेखनीय प्रगतीबाबत राष्ट्राध्यक्षा शेनबाउम यांनी कौतुक केले आणि समान क्षेत्रात सहकार्य करण्याविषयी स्वारस्य व्यक्त केले. अर्धवाहक, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम आणि दुर्मिळ खनिजे यासारख्या क्षेत्रात उभय देशांनी प्रगतीची संधी शोधण्याची बाब पंतप्रधानांनी अधोरेखित केली. नेत्यांनी उभय बाजूंचे थिंक टँक (विचारगट) दरम्यान आगामी संवाद सत्रे आणि उभय देशांतील चैतन्यदायी सांस्कृतिक आणि नागरिक परस्पर संबधांना गती देण्याच्या मुद्द्यांवर विचारविनिमय केला. ज्यामुळे पर्यटनाला देखील अधिक प्रमाणात वाव मिळण्याची शक्यता आहे.

4. भागीदार देश म्हणून, नेत्यांनी जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर आणि ग्लोबल साउथच्या प्राधान्यांवर विचारांचे आदान-प्रदान केले. पंतप्रधानांनी वर्ष 2016 मधील मेक्सिको भेटीचे आवर्जून स्मरण केले. भारत भेटीसाठी राष्ट्राध्यक्ष शेनबाउम यांना निमंत्रित केले.

कनानास्किस

17 जून 2025